पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय

कार्यपत्रिका क्रमांक ३

**सभावृत्तांत**

दिनांक:- ११/६/२०१४ वेळ. दुपारी १२.०० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ११/०६/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा.वनिता एकनाथ थोरात सभापती
२. मा.पौर्णीमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.अरुणा दिलीप भालेकर
४. मा.राहुल गुलाब जाधव
५. मा.संगीता शाम पवार
६. मा.शुभांगी संजय बो-हाडे
७. मा.अश्विनी सचिन चिखले
८. मा.मंदाकिनी अर्जुन ठाकरे
९. मा.समीर मोरेश्वर मासुळकर

याशिवाय श्री.ज्ञानेश्वर ढेरे - क्षेत्रीय अधिकारी, श्री.विश्वास नगरे - प्रशासन अधिकारी श्री.संदेश चव्हाण - कार्यकारी अभियंता विदयुत, श्री.कांबळे व्हि.जी. - उपअभियंता स्थापत्य, श्री.के.एस.महाजन - उपअभियंता पाणीपुरवठा, श्री.टी.एच.दाते - सहा.आरोग्य अधिकारी, श्री.ए.के.ढवळे - उपअभियंता जलनि:सारण इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्माननिय नगरसदस्य,नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

मा.सभापती यांचे परवानगीने खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१ मा.मंदाकिनी अर्जुन ठाकरे व मा.समीर मोरेश्वर मासुळकर यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र.२८ यशवंतनगर चौकाला महात्मा ज्योतीबा फुले चौक असे नांव देणे

विषय क्र.२ मा.मंदाकिनी अर्जुन ठाकरे व मा.समीर मोरेश्वर मासुळकर यांचा प्रस्ताव
ले आऊटची ओपन स्पेस ताब्यात घेणेबाबत

विषय क्र.३ मा.मंदाकिनी अर्जुन ठाकरे व मा.समीर मोरेश्वर मासुळकर यांचा प्रस्ताव
स्थापत्य विषयक कामे करणेबाबत

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक:- मा.शुभांगी बो-हाडे अनुमोदक:- मा.अरुणा भालेकर

केंद्रीय ग्रामविकास मंत्री श्री.गोपीनाथ मुंढे यांचे नुकतेच अपघाती निधन झालेने त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात येवून आज होणारी प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ९/७/२०१४ रोजी दुपारी ११.३० वा.पर्यंत तहकुब करण्यात यावी.

सदरची सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली.

सही/-
(सौ.वनिता एकनाथ थोरात)
सभापती
फ प्रभाग समिती